# महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

एमएमटीसी हाऊस, तळमजला
प्लॉट नं. सी २२, ब्लॉक - ई ,
वांद्रे कुर्ला संकुल,
वांद्रे (पुर्व),मुंबई ४०० ०५१ .

संकेतस्थळ– www.mahabocw.in
दुरध्वनी व फॅक्सक्र. ०२२-२६५७२६३१
ई-मेल- bocwwboardmaha@gmail.com

जा.क्र.क.यो/२०२२/प्र.क्र.७/ संकीर्ण-२/ 2620 दिनांक : 29 NOV 2022

प्रति,

**मा.अप्पर कामगार आयुक्त,**
कोकण/पुणे/नागपूर
**मा.कामगार उप आयुक्त,**
मुंबई शहर/पुर्व/ठाणे/पालघर/रायगड/नाशिक/ औरंगाबाद / अमरावती
**सहाय्यक कामगार आयुक्त,**
भिवंडी/ भंडारा/सांगली/
सातारा/ कोल्हापूर/इचलकरंजी/ अहमदनगर/नांदेड/ सोलापूर/चंद्रपूर
अकोला/जळगांव/धुळे/लातूर
**सरकारी कामगार अधिकारी,**
वाशिम/वर्धा/तुमसर/बुलढाणा/बार्शी/बीड/ धुळे/नंदुरबार/यवतमाळ
/मालेगांव/जालना/हिंगोली/गडचिरोली/सिंधुदुर्ग/परभणी/उस्मानाबाद

**विषय-** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातर्गंत विविध कल्याणकारी योजनांच्या लाभ वाटपाबाबत...

**संदर्भ-** मंडळाचे पत्र क्र.क.यो/२०२२/प्र.क्र.०७/ संकीर्ण-२/१७११ दि.२५.०७.२०२२ अन्वये मंडळाचे विविध कल्याणकारी योजंनाचे निकष व आवश्यक कागदपत्रे आणि लाभार्थी अर्ज मंजूरीपुर्वी अवलंबवयाची कार्यपध्दती याविषयी दिलेल्या विस्तृत सूचना

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये, मंडळाचे विविध कल्याणकारी योजंनाचे निकष व आवश्यक कागदपत्रे आणि अर्ज मंजूरीचे कार्यपध्दतीबाबत विस्तुत सुचना देण्यात आलेल्या आहेत. सदर पत्रातील मुद्दा क्र.५ (ब) मध्ये “संगणक प्रणालीत लाभार्थ्यांने लाभाचा अर्ज सादर केल्यावर लाभार्थ्यांस मुळ कागदपत्र तपासणीकरिता कार्यालयस्तरावरुन कळविण्यात यावे लाभार्थ्यांस वेळ देताना अधिकाऱ्यांनी स्वत:च्या कार्यालयीन उपस्थितीबाबतही दक्षता घ्यावी. ” असे कळविण्यात आले होते. तसेच मुद्दा क्र.५

(ड) मध्ये "वरीलप्रमाणे करावयाच्या कार्यवाहीस कार्यालयात सुचना फलकावरही सुचना लावण्यात याव्यात.तसेच सदरच्या सुचना मंडळाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करणेबाबत याव्दारे सुचीत करण्यात येत आहे.जेणेकरुन दिलेल्या वेळेत संबंधित लाभार्थी मुळ कागदपत्रासह कार्यालयात उपस्थित राहतील", असे कळविण्यात आले होते.

त्याऐवजी, संदर्भीय पत्रातील उपरोक्त सुचनांमध्ये बदल करुन खालीलप्रमाणे सुधारीत सुचना देण्यात येत आहेत."बांधकाम कामगारांने लाभाकरिता संगणक प्रणालीवर अर्ज सादर करताना मूळ कागदपत्रे अपलोड करावीत व कागदपत्रे तपासून अर्ज योजनेच्या निकषांच्या पुर्ततेअंती मंजूर करण्यात यावे. अर्ज तपासताना बनावट कागदपत्रे एडिटिंग केलेले, कागदपत्रांमध्ये खाडाखोड किंवा मूळ कागपत्रात बदल करण्यात आलेला नाही हे ही तपासावे. सदरचा अर्ज तपासणीकरीता मुळ कागदपत्रांसह अर्जदारास उपस्थित राहण्याची आवश्यकता नाही.

वरीलप्रमाणे सुचनांचे पालन करण्यात यावे व चुकीच्या पध्दतीने तसेच चुकीच्या लाभार्थ्यांच्या खात्यात अर्थसहाय्याची रक्कम जमा होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

24/01/2022

(विवेक शं. कुमार)
सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

प्रत सादर-
मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांना माहितीस्तव सविनय सादर.